ई-पेमेंटद्वारे शुल्क भरण्याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयासाठी एक साठा खाते (Pooling Account) व ५० कार्यालयांकरिता चालू खाते (Current Account) उघडण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी ०११६/प्र.क्र.१२/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २२ जानेवारी, २०१६.

वाचा : गृह विभाग शासन निर्णय क्र. एमव्हीआर-११०९/प्र.क्र.४२२/परि-२, दि. ०५ जून, २०१०.

शासन निर्णय -

परिवहन विभागाद्वारे जारी करण्यात येणा-या वाहन चालक अनुज्ञप्ती व वाहनाचे नोंदणीपत्र अर्जदारास पोस्टामार्फत घरपोच पाठविण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क जमा करण्यासाठी शासन निर्णय दि. ०५ जून, २०१० अन्वये प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या संबंधित कार्यालय प्रमुखाच्या नावे स्वीय प्रपंजी खाते (Personal Ledger Account) उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता परिवहन विभागाद्वारे अर्जदारास ऑनलाईन ई-पेमेंटद्वारे शुल्क भरण्याची सुविधा (SBI e-Pay) उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयाच्या नावे एक साठा खाते (Pooling Account) व राज्यातील ५० प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या नावे प्रत्येकी एक चालू खाते (Current Account) स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४/२०१६ को.प्र.-५ दि. १३/०१/२०१६ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१०३६१५६०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

M B Tashildar
Digitally signed by M B Tashildar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=M B Tashildar
Date: 2016.01.22 11:48:07 +05'30'

(मो.बा.ताशिलदार)
अवर सचिव

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मंत्री / राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.

५) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय (परिवहन आयुक्त यांचे मार्फत).

६) सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय(परिवहन आयुक्त यांचे मार्फत).

७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

९) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

१०) निवड नस्ती / परि-४.